# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग,पुणे

**जाहिरात** **क्र. (१/२०२४)**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मुंबई कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखकाचे रिक्त पद सेवानिवृत्त उच्चश्रेणी लघुलेखकामधून भरण्याकरिता इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी परिपूर्ण भरलेले अर्ज दि. २४ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत msbccpune@gmail.com या मेलवर पाठवावेत. नियुक्तीच्या अटी,शर्ती व अर्जाचा नमुना शासनाच्या obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(आ.उ.पाटील)
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग,पुणे.

## विहित नमुन्यातील अर्ज

प्रति,

मा.सदस्य सचिव,
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग,
पुणे

विषय : महाराष्ट्र राज्य आयोगाच्या कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक पदावर नियुक्ती मिळणेबाबत.

संदर्भ : आयोगाची जाहिरात क्र.१/२०२४ दि.९/१०/२०२४

महोदय,

संदर्भाधीन जाहिरान्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मुबई कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक या रिक्त पदावर सेवानिवृत्त उच्चश्रेणी लघुलेखकाची नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात आले आहेत. नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून मला त्या मान्य आहेत. सदर पदावरील नियुक्तीसाठी मी पात्र असून माझा वैयक्तिक व सेवाविषयक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. सेवानिवृत्त उच्चश्रेणी लघुलेखकाचे नाव :

२. वय : जन्म तारीख :

३. पत्ता:

४. मोबाईल क्र :

५. ई मेल आयडी :

६. सेवानिवृत्तीचा दिनांक :

७. कोणत्या पदावरून सेवानिवृत्त झाला आहात ?

८. सेवा कालावधीचा तपशील

| अ.क्र. | वर्ष | नियुक्तीचे कार्यालय | नियुक्तीचे पदनाम |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

९. शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता

| अ.क्र. | शैक्षणिक आर्हता तपशील | व्यवसायिक आर्हता तपशील /लघुलेखनाच्या व टंकलेखनाच्या प्रमाणपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| | | |

१०. विभागीय चौकशी चालू आहे काय ?

११. सेवा कालावधीत विभागीय चौकशी करण्यात आली होती काय ?

१२. सदर पदावर काम करण्यासाठी वैद्यकीय दृष्ट्या सक्षम आहात काय ?

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक असून यामध्ये काहीही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी रद्द होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी

नाव

**महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, मुंबई कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक पदावर करार पध्दतीने सेवानिवृत्त व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठीच्या अटी व शर्ती.**

१. इच्छुक उमेदवार न्यायालयीन, शासकीय अथवा निमशासकीय सेवेतून किमान उच्चश्रेणी लघुलेखक पदावरुन निवृत्त झालेला असावा.

२. जाहिरातीद्वारे प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची नियुक्ती करता येईल.

३. सदर नियुक्ती सुरुवातीस १ वर्षासाठी असेल. उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास आवश्यकते प्रमाणे मुदतवाढ देण्यात येईल. परंतु नियुक्तीचा एकूण कालावधी ३ वर्षाचा असेल.

४. नियुक्त केलेल्या व्यक्ती ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील.

५. करारपद्धतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

६. सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१७/१२/२०१२ रोजीच्या शासननिर्णयातील अ (४) प्रमाणे बंधपत्र/हमीपत्र दयावे लागेल.

७. उच्चश्रेणी लघुलेखक पदाच्या कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

८. करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा,

९. अर्जदाराची विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०. मासिक परिश्रमिक व भत्ते दि.०८/०९/२०२३ रोजीच्या शासननिर्णयातील तरतुदीप्रमाणे देय राहतील.

११. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

१२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१३.करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१४.करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१५.करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१६.करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.